सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222
दूरध्वनी : 0253-2230580, 2230734, 2230229 फॅक्स :2231716
संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac,
ज्ञानगंगा घरोघरी
परीक्षा व नोंदणी विभाग

जा.क्र. : पनिका/नोंदणी/2017/ दिनांक : 25.06.2017.

अत्यंत महत्वाचे
प्रवेशार्थी विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना

शैक्षणिक सत्र 2017-18 वर्षासाठी आपण यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी इच्छा व्यक्त केल्याबद्दल आपले प्रथमतः आभार ! स्वागत असो.

विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयान्वये सर्व शिक्षणक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. ऑनलाईन प्रवेश करताना खालील बाबींकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे कि जेणेकरून आपल्या प्रवेशात येणाऱ्या अडचणी आपोआप दूर होतील व आपला ऑनलाईन प्रवेश सुकर व व्यवस्थित होईल.

1. प्रथमतः विद्यापीठ संकेतस्थळ **http://ycmou.digitaluniversity.ac** वर भेट द्यावी.
2. आपणांस ज्या शिक्षणक्रमाला प्रवेश करावयाचा आहे त्यासाठी विद्यापीठाच्या होमपेजवर Prospectus ह्या टॅबवर जाऊन विविध विद्याशाखानिहाय माहितीपुस्तिका उपलब्ध आहेत. माहितीपुस्तिकेतील आवश्यक तेवढी माहिती (उदा. शिक्षणक्रम प्रवेश पात्रता, कालावधी, शुल्क, अभ्यासक्रम निवड निश्चिती, मूल्यमापन इत्यादी) वाचन करावी व आपल्या संदर्भासाठी त्या पानांची प्रिंट काढून घ्यावी.
3. आपणांस ज्या शिक्षणक्रमाला प्रवेश करावयाचा आहे त्यासाठी विद्यापीठाच्या होमपेजवर Study Centers ह्या टॅबवर जाऊन आपल्या आवडीनुसार शिक्षणक्रमनिहाय अभ्यासकेंद्र सूची आपणांस पहाता येऊ शकेल.
4. आपल्या आवडीच्या शिक्षणक्रमाची माहितीपुस्तिका वाचून आपल्या शहरातील जवळच्या अभ्यासकेंद्राला भेट द्यावी. अभ्यासकेंद्रावर आपणांस आवश्यक असलेली माहिती मिळाल्यानंतर आणि प्रवेशाबाबत आपले समाधान झाल्यानंतरच आपणास ऑनलाईन प्रवेश करणे सोपे जाईल व आपला प्रवेश करण्यात अधिकची मदत होईल.
5. विद्यापीठाच्या होमपेजवर ऑनलाईन प्रवेश शैक्षणिक सत्र 2017-18 साठी ह्या ठिकाणी जाऊन त्यावर क्लिक करा. ह्यानंतर आपणांस पुढीलप्रमाणे स्वंतत्रपणे (बॉक्स) लिंक असतील.
   - 5.1 नव्याने प्रवेश करणाऱ्या आणि कायमनोंदणी क्रमांक नसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पहिल्या बॉक्समध्ये जाऊन प्रवेश करता येईल.
   - 5.2 कायमनोंदणी क्रमांक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुढील वर्षाचा प्रवेश करण्यासाठी दुसरा बॉक्स असेल त्यावर जाऊन प्रवेश करता येईल.
6. उपरोक्त 5.1 नुसार ऑनलाईनला प्रवेश करताना आपणांस प्रथमतः OTP मिळतो. सदरचा OTP आपल्या मोबाईल आणि ई-मेलवर येतो त्यानुसार पुढील माहिती भरून प्रवेश करता येऊ शकेल.

7. उपरोक्त 5.2 नुसार प्रवेश करताना विद्यार्थ्याला यापूर्वी मिळालेला कायमनोंदणी क्रमांक हा आपला युजर आयडी असेल आणि पासवर्ड आपण मागील वर्षी वापरल्यानुसारच आपली प्रोफाईल उघडली जाईल, त्यानंतरच प्रवेश करता येईल.
8. कायमनोंदणी क्रमांक असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश करताना युजर आयडी जर आपला पासवर्ड आठवत नसेल **फरगॉट पासवर्डवर क्लिक** करून पुढील माहिती भरून आपला पासवर्ड मिळावावा आणि नंतरच प्रवेश करण्यात यावा.
9. आपला युजरआयडी व पासवर्डन्वये प्रवेश करता आला नाही तर विद्यापीठाशी संपर्क करूनच आपला प्रवेश करावयाचा आहे, अन्यथा आपला प्रवेश चुकू शकतो. त्यामुळे प्रवेश करताना काळजी घ्यावी.
10. कायमनोंदणी क्रमांक असणाऱ्या विद्यार्थ्यानी नव्याने प्रवेश केल्यास त्यांच्या प्रवेशात अडचण येऊ शकते त्याचप्रमाणे पुढे निकालातही अडचण येणार आहे.
11. ऑनलाईन प्रवेश करताना आपल्या प्रोफाईलमधील माहिती काळजीपूर्वक वाचून भरा. त्यातील आपले संपूर्ण मराठी व इंग्रजी नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी या गोष्टी काळजीपूर्वक भराव्यात. ह्यात चुका होणार नाही याची काळजी घ्या.
12. प्रवेशाच्या वेळी प्रोफाईलमध्ये टाकलेला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी **आपला शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत बदलता येणार नाही.** जर वारंवार बदल केला तर आपणांस विद्यापीठामार्फत पाठविण्यात येणारे दूरध्वनीवरील मेसेज अथवा ई-मेल मिळणार नाहीत.
13. आपल्या प्रोफाईलन्वये आपणांस परीक्षा प्रवेश पत्र, गुणपत्रक, पासिंग सर्टिफिकेट, पदवी/पदविका प्रमाणपत्र मिळणार आहे. तसेच विद्यापीठातर्फे विविध प्रकारचे एसएमएस आपणास पाठविण्यात येणार असल्याने मोबाईल क्रमांक एकच ठेवावा, वारंवार त्यात बदल करू नये. त्यामुळे उपरोक्त 11 क्रमांकातील माहिती काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे.
14. ऑनलाईन प्रवेश करताना प्रोफाईल सोबतच शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, आपला स्वतःचा फोटो, स्वाक्षरी अचूक स्कॅन करणे आवश्यक आहे. स्कॅन कशा स्वरूपाचे असावे ह्याबाबत संबंधित ठिकाणी सूचना आणि स्कॅन करण्याबाबतची साईज दिलेली आहे.
15. इलिजिबीलीटीदाखल योग्य ती कागदपत्रे ऑनलाईनला टाकताना अर्धवट कागदपत्रे, अपूर्ण अथवा चुकीची टाकू नयेत, त्यामुळे आपला प्रवेश पात्रता करताना अपात्र करण्यात येतो अथवा नाकारण्यात येतो. त्यामुळे आपल्या प्रवेशासाठी असलेली कागदपत्रे संबंधित ठिकाणी काळजीपूर्वक स्कॅन करून टाकावी.
16. शैक्षणिक पात्रतेच्या कागदपत्रांअभावी अथवा त्रुटीअभावी प्रवेश अपात्र झाल्यास तात्काळ आपल्या मोबाईलवर एसएमएस पाठविण्यात येत असतो त्यामुळे विद्यापीठाकडून आलेल्या एसएमएस अथवा ई-मेलवर लक्ष ठेवावे.
17. अपात्र विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अनाऊंसमेंट अथवा न्यूज टॅबमध्ये टाकलेली असते ती आपण सातत्याने पहात रहावी. वेळेत अपात्रतेची यादी न पाहिल्यास आपला प्रवेश ऑनलाईनला करून देखील रद्दबादल ठरला जाऊ शकतो.
18. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश केल्यानंतर **आपला प्रवेश पात्र किंवा अपात्र झाला** ह्याबद्दल विद्यार्थ्यांनी आपल्या युजर आयडी आणि पासवर्डनुसार अँडमिशन स्टेटसमध्ये आपण पाहू शकता. त्यामध्ये अपात्र असल्यास **रिजेक्ट** आणि पात्र असल्यास **अँप्रुव्हड** असा शेरा येतो. त्यामुळे ह्याकडे सातत्याने लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

19. शिक्षणक्रमनिहाय विषय/अभ्यासक्रम निवड करताना माहितीपुस्तिकेतील आधार घेणे आवश्यक आहे. प्रवेश पात्र झाल्यानंतर विषय बदल करण्यात येऊ नये अथवा बदलल्यास आपली प्रोफाईल आणि परीक्षा प्रवेशपत्र यामध्ये अडचण येत असते. त्यामुळे काळजीपूर्वक विषय निवड करावी.
20. अभ्यासकेंद्र बदल, माध्यम बदल, शिक्षणक्रम बदल इत्यादी बदल आपणांस करता येणार नाही. त्यामुळे प्रवेश करताना ऑनलाईनमधील मराठी व इंग्रजी सूचना काळजीपूर्वक वाचूनच प्रवेश करणे अपेक्षित आहे. आपणांस ज्या शिक्षणक्रमास प्रवेश करावयाचा असेल त्या शिक्षणक्रमाची माहिती आपल्या आवडीच्या अभ्यासकेंद्रावर घेतल्याशिवाय प्रवेश करू नये.
21. प्रवेश चुकीचा अथवा अपात्र झाल्यास विद्यापीठ नियमानुसार कोणत्याही प्रकारचे शुल्क परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.
22. प्रवेश शुल्क भरताना फक्त **विद्यापीठ हिस्सा ऑनलाईन प्रवेशाच्यावेळी बँकींगन्वये (नेट बँकींग) भरावयाचा आहे.** प्रवेश शुल्क भरल्यानंतर प्रवेश अर्जांची प्रिंट काढून सदरची प्रत आपण तात्काळ आपल्या अभ्यासकेंद्रावर जमा करावयाची आहे. त्याचवेळी आपल्या प्रवेश **शुल्कातील अभ्यासकेंद्र हिस्सा आपल्या अभ्यासकेंद्रावर जमा करावयाचा आहे.** प्रवेश अर्जाची प्रिंट आणि अभ्यासकेंद्र हिस्सा आपण जर आपल्या अभ्यासकेंद्रावर जमा केली नाही तर आपणांस आपल्या अभ्यासकेंद्रावरून अध्ययन साहित्य मिळणार नाही. तसेच अंतर्गत मूल्यमापन आणि अंतिम परीक्षेच्यावेळी आपणांस अडचण येईल.
23. प्रवेश शुल्क ऑनलाईन भरताना विद्यापीठाने दिलेल्या सूचनांप्रमाणे प्रवेश शुल्क भरावे, तांत्रिक अडचण आल्यास थोडे थांबून पुन्हा प्रयत्न करावा, **जास्त घाई करून शुल्क डबल भरू नका. त्यामुळे परतावा करणे अवघड होते. आपले पेमेंट फेल गेल्यास आपल्या बँकेशी संपर्क करूनच पेमेंट पुन्हा ऑनलाईन भरावे.**
24. ऑनलाईन प्रवेश पूर्ण झाल्यानंतर आपल्या स्वतःसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज व बँक चलनाची एक प्रत प्रिंट काढून आणि अभ्यासकेंद्राचा हिस्सा भरल्याची चलन अथवा पावतीची प्रत आपणाकडे ठेवणे आवश्यक आहे.
25. आपला प्रवेश कायम होण्यासाठी आपल्या अभ्यासकेंद्रावर त्याची प्रिंट जमा करणे विद्यार्थ्यास बंधनकारक आहे.
26. आपला प्रवेश इलिजिबीलीटी विभागामार्फत पात्र झाल्यानंतर आपणांस आलेल्या एसएमएसनुसार आपली प्रोफाईल तपासून पहावी. त्यात दुरूस्ती असल्यास आपणांस विद्यापीठाच्या धोरणानुसार प्रकिया शुल्क रूपये 300/- चा धनाकर्ष 'फायनान्स ऑफिसर, वायसीएमओयु, नाशिक' यांचे नावे काढून डीडीच्या पाठीमागे विद्यार्थ्याचे नाव, प्रवेश अर्ज क्रमांक, मोबाईल क्रमांक लिहून विनंती अर्जासह परीक्षा नियंत्रक, यचममु विद्यापीठ, नाशिक 422 222 ह्या पत्त्यावर विद्यापीठाला पाठवून दुरूस्ती करावी लागणार आहे.
27. प्रोफाईलमध्ये काही दुरूस्ती असल्यास विद्यापीठातर्फे संकेतस्थळावर दिलेले नोटिफिकेशन वेळोवेळी तपासून घ्यावे व त्यानुसार कार्यवाही वेळेत करणे आपणांवर बंधनकारक असेल. आपण वेळेत कार्यवाही पूर्ण न केल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार असणार नाही.
28. महाराष्ट्र शासनाने मंजूरी केलेल्या आरक्षण प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीबाबतचे स्वतंत्रपणे नोटिफिकेशन दिलेले असून त्याचे काळजीपूर्वक वाचन करूनच आपल्या ऑनलाईन प्रवेशाची आणि शिष्यवृत्तीदाखल ऑनलाईन अर्जाची समाजकल्याण विभागाच्या वेबसाईटवरून कार्यवाही वेळेत करावयाची आहे.

29. अंध विद्यार्थी, कैदी बांधव आणि आत्महात्याग्रास्त शेतकऱ्यांची पाल्ये यांना विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार प्रवेश शुल्कात संपूर्णपणे सूट देण्यात आलेली आहे संबंधित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याऐवजी ऑफलाईन प्रवेश अर्ज आपण निवड केलेल्या जवळच्या अभ्यासकेंद्रावर खालील तक्त्यातील कागदपत्रांसह दिनांक 14.08.2017 पूर्वी जमा करावयाचा आहे. अभ्यासकेंद्रामार्फत सदरचे प्रवेश अर्ज तात्काळ विद्यापीठाला पाठविण्यात येतील आणि विद्यापीठ पातळीवर सदरचे प्रवेश कायम करण्यात येतील. त्यानंतर प्रवेश केल्यास प्रवेशाची कार्यवाही वेळेत होणार नाही याची विद्यार्थ्यांनी काळजी घ्यावी.

नं.	विद्यार्थी प्रवर्ग	नवीन प्रवेशार्थींसाठी	जुन्या विद्यार्थ्यांसाठी (उदा. 16 अंकी कायमनोंदणी क्रमांक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी)
1.	अंध	ऑफलाईन प्रवेश अर्ज, अंधत्वाचा सिव्हील सर्जन दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे.	ऑफलाईन प्रवेश अर्ज सर्व पूर्ततेसह आणि कायमनोंदणी क्रमांकाचा असल्याचे कागदपत्र.
2.	बंदी बांधव	ऑफलाईन प्रवेश अर्ज, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, केंद्रसंयोजकांचे शिफारसपत्र.	ऑफलाईन प्रवेश अर्ज सर्व पूर्ततेसह आणि कायमनोंदणी क्रमांकाचा असल्याचे कागदपत्र.
3.	आत्महात्याग्रस्त शेतकरी पाल्य	ऑफलाईन प्रवेश अर्ज, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, केंद्रसंयोजकांचे शिफारसपत्र.	ऑफलाईन प्रवेश अर्ज सर्व पूर्ततेसह आणि कायमनोंदणी क्रमांकाचा असल्याचे कागदपत्र.

30. प्रवेशासंबंधी काही या व्यतिरिक्त अडचण आल्यास आपल्या जवळच्या अभ्यासकेंद्राशी, विभागीय केंद्रांशी अथवा विद्यापीठाच्या नोंदणी कक्षाशी (0253-2230580, 2230734) संपर्क करावा. तसेच nondani@ycmou.digitaluniversity.ac ह्या मेलवर आपली अडचण कळवू शकता.

आपणाकडून ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत सहकार्याची अपेक्षा ! कळावे.

आपला विश्वासू,

प्रा.(डॉ.) अर्जुन घाटुळे,
परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीसाठी - 1. मा. कुलगुरू, यचममु विद्यापीठ,नाशिक, 2. मा. कुलसचिव, यचममु विद्यापीठ,नाशिक
3. मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, यचममवि, नाशिक
4. मा. संचालक, विभागीय केंद्र, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नांदेड.

ता.क.- मा. विभागीय केंद्र संचालकांना नम्र विनंती की, कृपया आपल्या विभागीय केंद्रांतर्गत कार्यरत असलेल्या अभ्यासकेंद्रांना उपरोक्त पत्रातील मुद्यांची माहिती द्यावी व जास्तीत जास्त प्रवेश वेळेत करण्याबाबत प्रोत्साहित करावे ही विनंती. तसेच प्रवेश प्रक्रियेसंदर्भात केंद्रसंयोजकांच्या कार्यशाळेत ह्या पत्रातील मुद्यांसंदर्भात मार्गदर्शन करण्यात यावे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
Yashwantrao Chavan Maharashtra Open University
Dnyangangotri, Nashik 422 222, MS, India

ज्ञानगंगा घरोघरी

Form No:

Please paste a passport size (35 mm X 45 mm) Photograph here, Do NOT staple. Photo should not exceed the borders.

येथे पासपोर्ट साईजचा (३५X४५ मी.मी.) फोटो चिकटवावा. स्टेपल करू नये. फोटो चौकटीच्या बाहेर जाऊ नये.

Programme Name (शिक्षणक्रमाचे नाव) :	**Programme Code** शिक्षणक्रम संकेतांक:	**Medium of Programme** (शिक्षणक्रमाचे माध्यम): ☐ English ☐ Marathi ☐ Hindi ☐ If Other, Specify
Year (वर्ष)(प्रथम/द्वितीय/तृतीय):	**Semester** (सत्र):	
Study Centre Name (अभ्यासकेंद्राचे नाव):	**Study Centre Code** (अभ्यासकेंद्र संकेतांक):	**Payment Date:**
Bank of Maharashtra Challan No:	**Amount in Rs.:**	**Bank Transaction No:**

For study centre use only (फक्त अभ्यासकेंद्रासाठी) → **Documents Verified by Study Centre and Eligible for Admission:** ☐ Yes ☐ No

Important instructions for students (विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना):

a. Read prospectus carefully before filling the admission form (प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचावी)

b. Use **black** ink ballpen to fill the form. No overwriting. (अर्ज काळ्या शाईच्या बॉलपेननेच भरावा. खाडाखोड करू नये)

c. Fill in all fields in **CAPITAL English** letters only. (अर्ज भरताना **कॅपिटल इंग्रजी** अक्षरांचाच वापर करावा)

d. **All the information in this form is compulsory and Study Centre should verify that this form is completely filled by the student.**

e. Mark ☑ in appropriate box. (योग्य त्या चौकोनात ☑ अशी खूण करावी.)

↑ Student should sign strictly **inside** this box only with black ink विद्यार्थ्याने वरील चौकटीच्या आतच काळ्या शाईने स्वाक्षरी करावी

16 digit PRN, if already given
१६ अंकी कायम नोंदणी क्रमांक (पूर्वी दिलेला असल्यास):

1. Personal Information Section (वैयक्तिक माहिती)

	Last Name (आडनाव)	*First Name (स्वतःचे नाव)*	*Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव)*	*Mother's Name (आईचे नाव)*
Name of the Student (in English):				
विद्यार्थ्याचे नाव (मराठीमध्ये):				
Name of the Student as printed on Leaving or 10th std. certificate (१० वी किंवा शाळेच्या प्रमाणपत्रावर असलेले नाव)				

Marital Status वैवाहिक स्थिती : ☐ Unmarried अविवाहित ☐ Married विवाहित ☐ Divorced घटस्फोटित ☐ Widowed विधवा/विधुर ☐ Deserted परित्यक्ता

Date of Birth जन्मतारीख : D D M M Y Y Y Y **Gender** लिंग: ☐ Male पुरुष ☐ Female स्त्री **Mother tongue** मातृभाषा:

Place of Birth जन्माचे ठिकाण:	**Blood Group** (with Rh) रक्तगट:	**Religion** धर्म :	Nationality राष्ट्रीयत्व:
Student's location Category रहिवासाचे क्षेत्र:	☐ Rural ग्रामीण	☐ Urban शहरी	☐ Tribal आदिवासी

Employment Status: ☐ Employed ☐ Unemployed

If Employed: ☐ Service (नोकरी) ☐ Business (धंदा) ☐ Profession (व्यवसाय) ☐ Other इतर

Occupation हुद्दा/काम :

Work Experience in Years व्यावसायिक अनुभव:

Gap in education in Years शिक्षणातील खंड:

Your Annual Income (Rs.) (last financial year) मागील आर्थिक वर्षाचे उत्पन्न रुपयांत:

Address and Contact Details for Correspondence संपर्कासाठी पत्ता:

PIN पिन:

Country:	**State** राज्य:	**District** जिल्हा:	**Tehsil** तालुका:	**City/Town/Village** शहर/गाव/खेडे :
Phone STD Code दूरध्वनी एसटीडी:	Phone No. दूरध्वनी क्रमांक:		**Mobile number** भ्रमणध्वनी क्र.:	**Email ID** ई-मेल :
Only for N.R.I./ Foreign Student →	**Name of Country (Nationality):**		**Sponsoring Agency:** ☐ Private ☐ Govt ☐ Other	
Passport No:	**Type of Visa:**		**Residential Permit No:**	**Police Verification:** ☐ Yes ☐ No **Enclosed docs**
Validity upto:	**Validity upto:**		**Date:**	

2. Legal Reservation Category Information Section (जातीच्या प्रवर्गाची माहिती)

Domicile of State रहिवासी (राज्य) : **Category** जातीचा प्रवर्ग: ☐ Open खुला ☐ Reserved आरक्षित

If Reserved (आरक्षित असल्यास): ☐ SC ☐ ST ☐ DT(A) ☐ NT(B) ☐ NT(C) ☐ NT(D) ☐ OBC ☐ SBC

Caste जात: **Sub-Caste** उपजात:

Whether belong to Minority Category: ☐ Yes ☐ No **If Yes which:** ☐ Muslim ☐ Jain ☐ Christian ☐ Sikh ☐ Parsi ☐ Nav-Baudh

If Physically Challenged शारीरिक अपंगत्व ☐ Visually Impaired दृष्टिदोष ☐ Speech Impaired मुकबधिर ☐ Hearing Impaired कर्णबधिर ☐ Mentally Retarded मतिमंद ☐ Orthopedic Disorder विकलांग

Percentage of Disability अपंगत्वाचे प्रमाण% : **Enclosed documents**

3. Social Reservation Information Section (सामाजिक आरक्षण प्रवर्गाची माहिती)

☐ Ex-Serviceman माजी सैनिक	☐ Member of Project Affected Family प्रकल्पग्रस्त	☐ WPD विधवा/ परित्यक्ता	☐ Prisoner बंदीजन
☐ Active-Serviceman आजी सैनिक	☐ Member of Earthquake Affected Family भूकंपग्रस्त	☐ Freedom Fighter स्वातंत्र्य सैनिक	

4. Other Information (इतर माहिती)

☐ University Employee/ 's Children	☐ Artist Person	☐ Sports Person played at College/ District/ State/ National/ International level

5. Guardian Information Section (पालकाबद्दल माहिती)

Guardian's Name पालकाचे नांव:	Annual Income of the Guardian (Rs.) (last financial year) पालकाचे मागील आर्थिक वर्षाचे उत्पन्न रुपयांत:
Occupation of the Guardian पालकाचा हुद्दा/काम : Service नोकरी / Business धंदा / Profession व्यवसाय / Farming Farmer शेती / Laborer मजुरी/ Retired निवृत्त / Other इतर	
Relationship of guardian with applicant पालकाशी नाते:	**Phone No.** पालकाचा दूरध्वनी क्र.:

6. Educational Details Section (शैक्षणिक माहिती)

[Write 'YES' in the last column, against the qualifying examination, on the basis of which you are seeking admission to the said course. Write 'NO' in front of other examinations]
[आपल्या अर्हता परीक्षेसामोरील शेवटच्या रकान्यात 'Yes' लिहावे] **Please Note: 10th Details are mandatory if passed. १० वी परीक्षा उत्तीर्ण असल्यास माहिती आवश्यक आहे**

Last College Attended शेवटचे कॉलेज/शाळा: **Year** वर्ष: **Roll No.:**

Name of Examination परीक्षा	Name of Board /University बोर्ड/विद्यापीठ	Name of School/College शाळा/कॉलेज	Date of Passing (DD/MM/YYYY) उत्तीर्ण दिनांक	Examination Seat No. (Last) परीक्षा आसन क्र.	Degree / Passing Certificate No. प्रमाणपत्र / पदवी क्र.	Marks Obtained मिळालेले गुण	Out of पैकी
Less than 10th १० वी पेक्षा कमी							
Std 10th(१० वी) Pass/Fail							
Std 12th(१२ वी) Pass/Fail							
Diploma(पदविका)							
Degree (पदवी)							
PG Degree पदव्युत्तर पदवी							
YCMOU Preparatory/ Other (इतर)							
YET/CET Qualifying/ Entrance/ Aptitude Test Details (अर्हता परीक्षा माहिती)							

7. Course Codes (अभ्यासक्रम संकेतांक)

1.	9.
2.	10.
3.	11.
4.	12.
5.	13.
6.	14.
7.	15.
8.	16.

8. Enclosures सोबत जोडलेली कागदपत्रे:

1.	4.	7.
2.	5.	8.
3.	6.	9.

9. Declaration by Student विद्यार्थ्याने दिलेली हमी

मी असे नमूद करतो की, प्रवेशासंबंधीचे माहितीपुस्तिकेतील नियम मी वाचले आहेत. प्रवेश अर्जातील भरलेली माहिती पूर्णपणे खरी असून कागदपत्रे जोडलेली आहेत.**अंतिम प्रवेश मुख्यालयातून निश्चित केला जाईल. तसेच भरलेले शुल्क परत किंवा वर्ग केले जाणार नाही, याची मला जाणीव आहे.** विद्यापीठाने घेतलेले प्रवेशाबाबतचे निर्णय व त्यात वेळोवेळी झालेले बदल मला बंधनकारक राहतील, तरी आपण मला प्रवेश द्यावा ही विनंती.

I hereby declare that, I have read the rules related to admission as given in the prospectus; and that the information furnished by me is true and complete to the best of my knowledge**. I am aware that my admission will be finalized by the University headquarters and that the admission fee will not be returned or transferred to next year in any case.** I further agree that the decision taken by the University and any change made in the rules regarding admission from time to time will be binding on me.

Place ठिकाण:

Date दिनांक:

Signature of the student विद्यार्थ्याची स्वाक्षरी:

Sign and seal of study centre (अभ्यासकेंद्राचा शिक्का व स्वाक्षरी):

Note: Student **MUST** retain photocopy of completely filled in admission form (both pages) for future reference. Available information in this form will be required to activate his/her account on http://ycmou.digitaluniversity.ac portal. पूर्ण भरलेल्या अर्जाची (दोन्ही बाजू) एक प्रत विद्यार्थ्याने **स्वत:कडे ठेवणे आवश्यक** आहे. ह्या अर्जावरील माहितीच्या आधारेच 'ई-सुविधा' अकाऊन्ट http://ycmou.digitaluniversity.ac वर ॲक्टिव्हेट करता येईल.